# शैक्षणिक सहकार्यासाठी सामंजस्य करार

**पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, कवठेमहांकाळ, जि.सांगली**

आणि

**श्री. रावसाहेब रामराव पाटील महाविद्यालय, सावळज, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली.**

शैक्षणिक गुणवत्ता संवर्धनासाठी पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, कवठेमहांकाळ, जि.सांगली व श्री. रावसाहेब रामराव पाटील महाविद्यालय, सावळज, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली. यांच्यामध्ये 'भुगोलशास्त्र' विभागांमार्फत खालीलप्रमाणे सामंजस्य करार करण्यात येत आहे.

१) या करारान्वये दोन्ही शैक्षणिक संस्था एकमेकासमवेत खालील बाबीवर एकत्रित काम/सहकार्य करतील.

अ) शाखांची अदलाबदल, गुणवंत विद्यार्थ्यांची अदलाबदल करणे.

ब) ग्रंथालयाच्या संदर्भग्रंथांच्या सुविधा उपलब्ध करुन देणे.

क) प्रशिक्षण, कार्यशाळा इत्यादींचे संयुक्तरीत्या आयोजन करणे.

ड) संशोधन प्रबंध सादर करणे, एखाद्या संशोधनसंदर्भात विशेषाधिकार प्राप्त करणे यासाठी दोन्ही संस्था एकत्रित किंवा संयुक्तपणे कार्य करतील.

इ) संशोधन प्रकल्पाकरीता वित्तीय व स्वयंसेवी संस्थामार्फत निधी मिळविण्यासाठी वैयक्तिक, एकत्रितरीत्या किवा संयुक्तपणे प्रयत्न करतील.

२) अंमलबजावणी

अ) वरील करारानुसार सविस्तर कार्यक्रमाचे नियोजन, शैक्षणिक सहकार्य धोरणे, त्याच्यातील आंतरक्रिया शाखांची अदलाबदली यंत्रणा तसेच विद्यार्थी विचारविनिमय व सल्लामसलतहेया शैक्षणिक करारात दर्शवितात.

ब) दोन्ही शैक्षणिक संस्था आर्थिक समर्थन परस्पर मान्य सहकारी संस्थांकरीता, योग्य त्या सरकारी आणि अन्य संस्थांकरीता सहमत असतील.

क) हा सामंजस्य करार स्वाक्षरीनंतर ५ वर्षे कार्यान्वीत राहील. हा करार आपोआप पुर्ननुतनीकरण केला जाईल. जोपर्यंत कोणत्याही एका संस्थेकडून संपुष्टात आणला जात नाही.

३) गोपनियता

दोन्ही शैक्षणिक संस्था या करारानुसार ५ वर्षांपर्यंत गोपनीय माहिती गोपनीयच ठेवतील. तो गोपनीय माहिती ते संस्थेतील इतर कोणत्याही व्यक्तीसमोर प्रदर्शित करणार नाहीत. या संबंधित असणा-या कर्मचा-या व्यतिरिक्त व संबंधित अधिका-यांच्या संमतीशिवाय कोणासही दर्शविणार नाहीत.

४) संशोधन सहकार्य व बौध्दिक मालमत्ता –

या करारानुसार दोन्ही शैक्षणिक संस्था विशिष्ट व वैयक्तिक संशोधन प्रकल्पांचे प्रस्ताव परस्पर सहकार्यासाठी विशिष्ट किंवा कोणत्याही वेळी केलेले किंवा वैयक्तिक संशोधन प्रकल्प करार केलेल्या संशोधन प्रकल्पांचा मसुदा तयार करतील व त्यांचे संरक्षण व संवर्धन करतील.

(५) करार संपुष्टता

काही कारणास्तव हा करार संपुष्टात आणणेकरीता. दोन्ही संस्था सर्व गोपनीय दस्तऐवज व कागदपत्रे एकमेकास परत करतील. करार समाप्ती करणेसाठी किमान सहा महिने अगोदर पूर्वसूचना देणेत यावी.

दि. 05-07-2019

| | | | |
|---|---|---|---|
| HEAD,<br>विभागप्रमुख<br>भुगोलशास्त्र विभाग<br>Padmabhushan Vasantraodada Patil Mahavidyalaya, Kavathe Mahankal, Dist.-Sangli. | विभागप्रमुख<br>भुगोलशास्त्र विभाग | श्री. ए.ए. कांबळे<br>आयक्यूएसी समन्वयक | IQAC Co-ordinator<br>Shri.Raosaheb Ramrao Patil Mahavidyalaya,SAVLAJ Dist.Sangli |
| Acting Principal<br>डॉ. एम.के. पाटील<br>Padmabhushan Vasantraodada Patil Mahavidyalaya, K. Mahankal Dist. Sangli | P.V.P. MAHAVIDYALAYA KAVATHE MAHANKAL Dist. Sangli 416 405. | SHRI RAOSAHEB RAMRAO PATIL MAHAVIDYALAYA Tal.Tasgaon Dist. Sangli SAVLAJ | PRINCIPAL<br>Shri.Raosaheb Ramrao Patil Mahavidyalaya,SAVLAJ,Dist.Sangli |